MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



## बीड जिल्हा भाजपाच्या चुकीच्या धोरणामुळे बजरंग बप्पाचे पारडे जड

बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष -०१ अंक -२२३ आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रु । पाने ४
Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-01 Issue -223 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

# दिलीप कांबळे,अमित गोरखे यांना मातंग वस्तीवरच काळं कुत्रही विचारायला तयार नाही

## ताई साहेब ऽऽऽओढून ताणून चंद्रबळ आणण्यात काहीच अर्थ नाही नंतर पश्चातापाची वेळ आल्याशिवाय राहणार नाही

## जिकडं गुलाल तिकडं उदोउदो करणाऱ्या कार्यकर्त्यांपेक्षा जिवाचे रान करणाऱ्या महत्व द्यायला हवे!

दिलीप कांबळे हे एसी गाडीतून खाली उतरायला तयार नाहीत उन्हामध्ये मातंग समाजाच्या महिलांना एसी गाडीमध्ये बसून दिलीप कांबळे यांनी पंकजाताईंना मतदान करा म्हणलं तेव्हा ऊसतोड मजूर असलेल्या मातंग समाजाच्या महिलांनी दिलीप कांबळे यांना उत्तर देत सांगितलं की तुम्ही काय बीडचे का तुमच्या मनात आम्ही कसं करणार मतदान पंकजाताईला तुम्ही कोण्या गावचे तुमचं नाव काय असं सवाल करताच दिलीप कांबळे यांचा पारस उन्हामध्ये चढला व ते इसी गाडीतून आपला का चढून पुढे चला निघा असं चिडत ड्रायव्हरला बोलून पुढे निघाले आहेत बीड माजलगाव गेवराई या तालुक्यांमध्ये दिलीप कांबळे असतील किंवा अमित बोडके असतील यांना मातंग समाजाचे ओळखलं नाही व मांगवाढ्याच्या दारावर सुद्धा उभा केलं नाही. मी मातंग समाजाचा मंत्री आहे असं दिलीप कांबळे यांनी सांगतात त्यांनी सांगितलं मंत्री तुमच्या घरच्या असतात बाबा इथे आमच्या सुखदु:खामध्ये जो बीड जिल्ह्यातला नेता मातंग समाजाचा येईल आम्ही त्याच्या पाठीशी आहोत असंही सांगितलं काही ठिकाणी तर दिलीप कांबळे यांना अक्षरशः लहान मुलांना घेऊन बैठक करावी लागली आहे यावेळी बीड तालुक्यातील अनेक मातंग समाज वस्त्यांमध्ये अमित घोडके असतील किंवा दिलीप कांबळे असतील यांना काळ कुत्र सुद्धा ओळखत नाही अशी परिस्थिती पाहायला मिळाली आहे.






- पंकजा मुंडे प्रीतम मुंडे यांना पुण्याहून आयात केलेल्या मातंग समाजाच्या नेत्यांची अवकात समाजामध्ये काय आहे ते कळाले
- माजी मंत्र्याच्या कार्यक्रमाला ४० ते ५०लोक त्यामधले १० वीस लेकर..
- पंकजा मुंडे यांना मातंग समाजाचा पाठिंबा ९९ टक्के तरी नाहीच.
- पंकजाताई मातंग समाजाचे पुण्याचे नेते आणून तुम्हाला मिळणार मतदान सुद्धा मिळणार नाही.
- प्रीतम मुंडे मुळे पंकजा मुंडे यांना फटका बसणार मातंग समाजाचा मोठा मतदार आयता बजरंग सोनवणे ला मिळाला आहे.
- दबंग खासदार म्हणून ओळख असलेल्या प्रीतम मुंडे यांना मातंग समाज किती गर्दी असते हे मेळाव्यातून आणि अनिता हॉटेलच्या बैठकीत नक्कीच कळालं आहे अशी खंत त्यांनी बोलून दाखवली आहे की मातंग समाजा मेळाव्याला यशवंतराव चव्हाण नाट्य घराचा खालची वरची बाल्कनी खचाखच भरलेली असताना त्यालाच मातंग समाजाचा मेळावा असं म्हणतात मातंग समाजाची गर्दी आपल्या पाठीमागे नाही आहे हे खासदार प्रीतम ताई मुंडे यांच्या लक्षात आलेला आहे म्हणून त्यांनी त्यांच्या गाडीमध्ये बसल्यानंतर एका
- त्यांच्या निकटवर्तीय माणसाजवळ मातंग समाज मेळाव्याला गर्दी कोण गोळा करू शकतो हे बोलून दाखवला आहे.
- माजी मंत्री दिलीप कांबळे भाजपा अनुसूचित जाती मोर्च्याचे प्रदेशाध्यक्ष आहेत त्यांना महाराष्ट्रातील मातंग समाज किती आहे व बीड जिल्ह्यामध्ये सध्या मातंग समाजाचे काय परिस्थिती आहे हे माहिती आहे का
- दिलीप दिलीप कांबळे हे मातंग समाजाचे मंत्री असताना त्यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये मातंग समाजासाठी काय केले असाही प्रश्न मातंग समाज वस्तीवर गाडीच्या खाली न उतरता समाजाने त्यांना खडे बोल सुनावले दिलीप कांबळे रागाराग तिथून निघून गेले
- अमित घोडके यांनी जो मेळावा घेतलेला आहे त्या मेळाव्याला मातंग समाजाचे मोजून ४० ते ५० कार्यकर्ते असतील बाकी इतर समाजाचे आलेल्या माणसांच्या गळ्यामध्ये पिवळा जय लहुजी चा गंजा टाकून मातंग
- समाजाचा दाखविण्याचा प्रयत्न पंकजा मुंडे व प्रीतम मुंडे यांच्याकडून होत आहे मातंग समाजाने पंकजा मुंडे यांच्या विरोधामध्ये दंड थोपटले आहेत.

बीड /प्रतिनिधी

बीड लोकसभा निवडणुकीसह सध्या भारत देशामध्ये निवडणुकीचे वारे जोराने व्हावू लागले आहे. यामध्ये सध्याच्या राजकीय परिस्थितीमध्ये पाहता महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती ही वेगवेगळ्या पक्ष फोडून तीन चाकी सरकार तयार झालेला आहे. यामध्ये भाजप ,शिवसेना, शिंदे गट ,राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टी, अजित पवार गट यांचं मिळून सरकार यावेळी महाराष्ट्रामध्ये चालू आहे.यावेळी फडणीस शिंदे पवार यांच्या सरकारने महाराष्ट्रात सह देशांमध्ये राजकारण करत असताना सध्याच्या परिस्थिती पाहता लोकसभेच्या निवडणुकीत आपला पक्षाची ताकद व प्रतिष्ठापनाला लावलेली आहे.यातच सर्वांना महाराष्ट्रामध्ये मराठा समाजाच्या आरक्षणाचा फटका सर्वच पक्षांना बसत असतानाच यावेळी महाराष्ट्र मध्ये प्रामुख्याने दिग्गज नेत्यांच्या परिवारातील नेत्यांच्या परिवारातील सदस्य पत्नी ,भाऊ ,भावजयई, आई, बहीण, वडील ,मुलगा, अशी नाते निवडणूक लढण्यामध्ये दिग्गज नेते हे रिंगणात उतरले असतानाच वेगवेगळ्या पक्षाने उमेदवारी दिलेली आहे. परंतु याच पार्श्वभूमी वरती सर्व महत्त्वाची म्हणजे दलित समाजातील नंबर दोनची समजली जाणारी जात मातंग समाजातून याच जातीचे माजी मंत्री दिलीप कांबळे व अण्णाभाऊ साठे महामंडळाचे माजी अध्यक्ष अमित गोरके यांना बीड जिल्ह्यामध्ये पंकजा मुंडे यांनी प्रचारासाठी आयात केले असून यांना मातंग समाजातील वस्तीच्या कार्यकर्त्यांची नावे सुद्धा माहित नाहीत तर पंकजाताई मुंडे प्रीतम ताई मुंडे यांनी हे नेते आयात का केलेले आहेत कोणामुळे अशी वेळ आलेली आहे हे नेमकं पंकजाताई मुंडे यांच्या लक्षात येत नसेल का असा प्रश्न बीड जिल्ह्यातील मातंग समाज वस्तीतील मतदार बांधवांना पडलेला आहे मातंग समाज हा ऊसतोड मजूर यांचा जिल्हा म्हणून बीड जिल्ह्यामध्ये मातंग समाजाचा सर्वात जास्त ऊसतोड मजूर आहे याच जिल्ह्याने स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांना मातंग समाजाने ताकद देत ऊसतोड मजुरांचा नेता बनविलेला आहे तर यावेळी पंकजा मुंडे यांना सुद्धा मातंग समाजाचा ऊसतोड मजुरांचा नेता बनविण्यामध्ये मातंग समाजाचा सिंहाचा वाटा असतानाच यावेळी पुण्याचे माजी मंत्री व भारतीय जनता पार्टी दलित आघाडीचे प्रदेशाध्यक्ष दिलीप कांबळे यांना बीड जिल्ह्यामध्ये आयात केलेला आहे आयात करण्यात आल्यानंतर अण्णाभाऊ साठे महामंडळाचे माजी अध्यक्ष अमित घोडके यांना सुद्धा भाजपने म्हणजेच पंकजाताई मुंडे व प्रीतम ताई मुंडे यांनी आयात केलेला असताना मांगवड्यामध्ये गेल्यानंतर त्यांना गाडीतून खाली उतरायचं म्हटलं तर इसी गाडीतून उतरून आम्हाला ऊन लागतंय समाजालाच गाडी जवळ बोलून समाजाला पंकजा ताईला मतदान करा म्हणून सांगितलं असतानाच यावेळी दिलीप कांबळे व अमित घोडके यांना तुम्ही कोण आहात तुम्हाला आम्ही ओळखत नाहीत कोणत्या गावचे तुम्ही पहिल्यांदाच आलात त्यावेळेस सांगतात की आम्ही मांगाचे पुढारी आहोत मांगाचे मंत्री आहोत आमच्या मान्यवर पंकजाताई मुंडे यांना लोकसभेमध्ये उमेदवार म्हणून मतदान करा मातंग समाजासाठी आम्ही अहोरात्र झटणारे आहोत त्यावेळेस मातंग समाजाच्या माता-भगिनी ह्या ऊस तोडणाऱ्या यांना सुद्धा कोणाला मतदान करायचा हा निर्णय स्वतः घेतल्यामुळे पंकजाताई मुंडे यांना आम्ही मतदान करणार नाही तुम्ही आज आलात बीड जिल्ह्यामध्ये तुम्ही नाहीत तर यावेळी बीडचे कुणीच कसे नेते दिसत नाहीत भाजपमध्ये असं यावेळी मांगाचे पुढारी भाजपमध्ये नाहीत का तर तुम्हाला पुणे मुंबईवरून आणला आहे असा सवाल यावेळी वडवणी माजलगाव सह बीड तालुक्यातील काही गावांमध्ये चालत चालत असताना यामध्ये रस्त्यावर उभा राहून दिलीप कांबळे व अमित घोडके यांनी संबंधित मातंग समाजाच्या माता-भगिनींना मतदानासाठी विनंती केली असताना बाहेर





येऊन बोला असं काही कार्यकर्ते बोलले तेव्हा ते म्हणाले की गाडीतून बाहेर येऊ शकत नाही खूप ऊन आहे आम्ही जास्त फिरू शकत नाहीत आम्हाला बंद नाहीत म्हणून आम्ही या ठिकाणी आलेलो आहोत परंतु त्यावेळी मातंग समाजाच्या माता-भगिनी व बंधूंनी सांगितले की आम्ही पंकजा मुंडे यांना का मतदान करायचं पंकजा मुंडे यांनी तुम्हाला मुंबई पुण्यावरून आणला आहे तर तुम्हीच मतदान करा असाही उलट सवाल यावेळी दिलीप कांबळे व अमित घोडके यांना पंकजाताई मुंडे यांच्या विरोधात घोषणा देत मातंग समाजाच्या लोकांनी अक्षरशा तिथून हाकलून लावले आहे अशी चर्चा सध्याच्या परिस्थितीमध्ये मातंग समाजाच्या वस्तीवर व ग्रामीण भागामध्ये बीड जिल्ह्यातील वेगवेगळ्या ठिकाणी ऐकवायला मिळत आहे दिलीप कांबळे असतील किंवा अमित घोडके असतील उपऱ्या नेत्यांच्या सांगण्यावरून आम्ही मतदान करणार नाही आमच्या सुखदु:खामध्ये दवाखाना पोलीस स्टेशन पंचायत समिती तहसील कोर्ट अशा कामासाठी आमच्या आणि नदीला सुखा दुखामध्ये जो मातंग समाजाचा कार्यकर्ता बीड जिल्ह्यामधला येईल त्याच्या पाठीशी आम्ही आहोत व जो आमच्यासाठी सदैव हजर आहे आणि त्याच्याशी एकनिष्ठ आहोत असाही मातंग समाजाच्या मातंग समाज वस्तीवरून मातंग बांधवांच्या तोंडून दिलीप कांबळे यांना उत्तर मिळाल्यानंतर दिलीप कांबळे यांनी राग राग तिथून निघण्याचा प्रयत्न केला असताना एकच शिट्टी व टाळ्या वाजवून त्यांना निरोप देत मातंग समाजाने दिलीप कांबळे व अमित घोडके यांना अक्षरशः हाकलून लावण्याचे काम यावेळी मातंग बांधवांनी केले आहे.

तसेच खासदार प्रीतम ताई मुंडे यांनी कानामध्ये बोलणाऱ्या दलाल भडव्या वृत्तीच्या कार्यकर्त्यांकडून मोठ्या मेळाव्याची अपेक्षा करायला पाहिजे पंकजाताई मुंडे यांना निवडून आणण्यासाठी जे लोक आपल्या जीवाचे रान करत आहेत अशा लोकांना बाजूला सारून प्रीतम ताई मुंडे यांनी अक्षरशः कार्यकर्त्यांच्या पाठीत खंजीत बसलेला असतानाच यावेळी मात्र अन्विता हॉटेल येथे तेच लोक आणि वेगवेगळे गमजे घालून प्रीतम मुंडे यांनी मातंग समाजाचा मेळावा व वेगवेगळ्या जाती धर्मांचा मेळावा संपन्न झाल्याच्या बातम्या काही दैनिकामधून छापून आणलेले आहेत परंतु तो समाज आज सुद्धा पंकजा मुंडे व प्रीतम मुंडे यांच्या पाठीशी बीड जिल्ह्यामध्ये उभा राहिलेला दिसत नाही एवढी गोष्ट मात्र निश्चित आहे की मातंग समाजासह छोटे छोटे जातीचा मेळावा घेऊन एकाच हॉलमध्ये ५० ते ७० लोक जमा करून प्रीतम मुंडे यांनी तो मेळावा यशस्वी झाल्याचे दाखवत काही दैनिकांच्या माध्यमातून जिल्ह्यातील जनतेच्या डोळ्यांपर्यंत असा कीविलवाणी दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे परंतु जनतेच्या डोळ्यापर्यंत सत्य परिस्थिती पोहोचल्यानंतर जनतेने याची शहानिशा केली आहे व जो मातंग समाजाचा माणूस नाही अशाही माणसाच्या गळ्यामध्ये पिवळा गमजा घालण्याचं काम प्रीतम मुंडे यांनी केलेला आहे पिवळा गांजा त्या व्यक्तीच्या गळ्यात घालून त्याला मातंग समाजाचा केला आहे परंतु प्रीतम मुंडे यांनी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न मिळावा म्हणून या अगोदर का प्रयत्न केले नाही असाही प्रश्न यावेळी मातंग समाजाच्या वतीने होत आहे

# ५० टक्के उद्दिष्टपूर्ती:लातूर शहरामधील ६०३१ पैकी ६०६६ घरकुलांचे बांधकाम पूर्ण

लातूर - प्रत्येक गरिबांच्या हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पंतप्रधान आवास योजना राबविण्यात येत आहे. या योजनेतंर्गत लातूर शहरात मंजूर असलेल्या ६०३१ घरकुलांपैकी ३०६६ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. यासाठी शासनाकडून एक १०३ कोटी दोन लाखांचा निधी मंजूर झाला आहे. तर ८९ कोटी तीन लाख ९० हजार इतका निधी खर्च झाला आहे.

गरिबांना हक्काचे घर मिळावे, हक्काच्या घराची स्वप्नपूर्ती व्हावी, यासाठी महत्त्वकांक्षी पंतप्रधान आवास योजना राबविण्यात येत आहे. मालकीची जागा असलेल्या अनेकांनी महानगरपालिकेकडे घरकुलसाठी अर्ज केले होते. त्यासाठी महानगरपालिकेला २०२४ मध्ये ६०३१ घरांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यापैकी ३०६६ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे, असे सांगण्यात आले.

या शिवाय रमाई आवास घरकुल योजनेतंर्गत २०१०-११ ते २०२३-२४ पर्यंत ४ हजार १९५ घरांना मंजूरी देण्यात आली आहे. त्यापैकी २७०२ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. ८३५ घरकुलांचे बांधकाम सुरु आहे. त्यासाठी ९२ कोटी ७८ लाख ५० हजारांचा निधी प्राप्त झाला होता. त्यापैकी ७८ कोटी ९७ लाख ४०



हजार इतका निधी खर्च झाला आहे. सन २०२३-२४ मध्ये ३०० घरांचे उदिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यासाठी ७ कोठी ५० लाख रूपयांच्या निधीची आवश्यकता आहे. महानगरपालिकेला ५० टक्के घरकुलांचे लक्ष्य पूर्ण करता आले आहे. सन २०२४-२५ वर्षात ३ हजार घरकुलांचे उदिष्ट पूर्ण करावयाचे आहे. त्यानुषंगाने महानगर पालिकेच्या वतीने नियोजन करण्यात आले आहे. अनेकांनी महानगरपालिकेकडे घरकुल मंजुरीसाठी लागणाऱ्या कागदपत्रासह प्रस्ताव महानगर पालिकडे सादर केले आहेत.

# देवदर्शनासाठी निघालेल्या भाविकांवर काळाची झडप

दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गावर रविवारी पहाटेच्या सुमारास भीषण अपघाताची घटना घडली. देवदर्शनासाठी निघालेल्या भाविकांच्या कारला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. या घटनेत एकाच कुटुंबातील ६ जणांचा जागीच मृत्यू झाला. तर दोघे जखमी झाले आहेत.

मृतांमध्ये ३ महिला आणि ३ पुरुषांचा समावेश आहे. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य केले. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलंय. मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत.

सध्या मृतांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अपघातग्रस्त व्यक्ती एकाच कुटुंबातील असून ते राजस्थानमधील सीकर येथून रणथंबोरला देवदर्शनासाठी निघाले होते. दिल्ली-मुंबई द्रुतगती मार्गावरून ते कारने प्रवास करीत होते.

रविवारी पहाटे ७ वाजेच्या सुमारास कार सवाई माधोपूर परिसरातील बनास कल्व्हर्टजवळ आली.



त्याचवेळी अज्ञात वाहनाने कारला जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती, की कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. या घटनेत कारमधून प्रवास करणाऱ्या ६ जणांचा जागीच मृत्यू झाला.याशिवाय कारमधील दोन मुलेही गंभीर जखमी झाली. अपघाताची माहिती मिळताच पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अथक प्रयत्नानंतर कारमध्ये अडकून पडलेले मृतदेह बाहेर काढण्यात आले. कारला कोणत्या वाहनाने धडक दिली हे अद्याप समोर आलेले नाही. पोलीस घटनेचा तपास करीत आहेत.

# उद्धव ठाकरेंचं मोदींना प्रत्युत्तर; म्हणाले, आजारपणात माझी चौकशी करता अन् तुमचे पाव उपमुख्यमंत्री

धाराशिव लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या प्रचारासाठी उद्धव ठाकरे यांची जाहीर सभा पार पडली. या सभेत उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका मुलाखतीत बोलताना 'उद्धव ठाकरे माझे शत्रू नाहीत, उद्या संकट आले तर त्यांच्या मदतीला धावून जाईल, असे सूचक विधान केले होते. आता त्यांच्या या विधानाला उद्धव ठाकरे यांनी प्रत्युत्तर दिले. तसेच देवेंद्र फडणवीस यांचा उल्लेख पाव उपमुख्यमंत्री असा करत भाजपावर हल्लाबोल केला.

उद्धव ठाकरे काय म्हणाले?

मी धाराशिवकरांच्या प्रेमाने आज




भारावून गेलो आहे. मराठी मातेचा आणि मराठी मातीचा आशीर्वाद घेऊन दिल्लीच्या हुकुमशाही विरुद्ध लढायला उभा राहिलो आहे. दिल्लीश्वरांना वाटतं की, उद्धव ठाकरे काही करु शकत नाहीत. मात्र, तुम्हाला हा महाराष्ट्र माती खायला लावल्याशिवाय राहणार नाही. ७ तारखेनंतर ओमराजे निंबाळकर यांना बाकीच्या मतदारसंघात प्रचार करायला घेऊन जाणार आहे. तुम्ही सर्वजण दिल्लीच्या हुकुमशाहांचे तख्त जाळून टाकल्या शिवायशिवाय राहणार नाहीत, असा विश्वास आहे. मी येथे मत मागायला आलो आहे, ४०० जागांचे जुगाड लावायला नाही, असा टोला उद्धव ठाकरे यांनी भाजपाला लगावला.

# भाजप संविधान बदलणार?

## भरसभेत खासदार प्रीतम मुंडेंनी घेतला विरोधकांचा समाचार

बीड -भाजप संविधान बदलणार? या विरोधकांच्या वक्तव्यावरून आता खासदार प्रीतम मुंडे ( चझ झीळींरा चींपवश) आक्रमक झाल्या आहेत. त्यांनी एक ना अनेक प्रश्न करत विरोधकांचा चांगलाच समाचार घेतला आहे. भाजपच्या मनामध्ये काही काळबेंद्र असतं, तर ते एवढ्या दिवस गप्प बसले असते का? २०१९ ते २०२४ मध्ये पार्लमेंटमध्ये भाजपची मेजॉरिटी आहे. ते काहीही करू शकले असते, अस वक्तव्या प्रीतम मुंडेंनी केलं आहे.

मात्र, ज्यांनी संविधानाचा सर्वात जास्त दुरूपयोग केला, ते काँग्रेस म्हणतंय संविधान बदलणार ? संविधानांने व्यक्ती स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य दिलं आहे. म्हणूनच काँग्रेसकडून उचलली जीभ अन लावली टाळुला, असं करत दिशाभूल केली जाते आहे. असं म्हणत भाजप खासदार प्रीतम मुंडेंनी विरोधकांचा चांगलाच समाचार घेतला आहे. त्या बीडमध्ये मातंग समाजाच्या मेळाव्यात बोलत होत्या.

यावेळी प्रीतम मुंडे म्हणाल्या, की आज मलाच एक प्रश्न पडला आहे, विरोधी पक्षातील लोक म्हणतात की, जर भारतीय जनता पार्टी पुन्हा ४०० पार करत सत्तेत आली तर संविधान बदलतील. मग, संविधान बदलण्याची भीती ठराविक एकाच जातीला आणि एकाच समूहाला का दाखवली जाते, असा सवाल त्यांनी यावेळी विचारला आहे. संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशातील सर्वांना दिलं आहे, मग ते बदलल्यानंतर फक्त एकाच जातीला नुकसान कसं होईल, असा प्रश्न देखील यावेळी त्यांनी विचारलं आहे.



मुंडे पुढे म्हणाल्या की, याचं एकच कारण आहे की. काँग्रेसची नेहमी एकच नीती राहिलेले आहे. ती म्हणजे भारतीय जनता पार्टीशी विकासावर लढता येत नाही, त्यामुळे एका जातीला एका धर्माला भीती दाखवली जात आहे. पूर्वी समान नागरी कायद्याविषयी उलट सुलट बोलल जात होतं. आरक्षण रद्द होईल, असं बोललं जात होतं. मात्र, समान नागरी कायद्याचा आणि आरक्षणाचा काहीही संबंध नसल्याचं त्यांनी सांगितलं आहे. २०१४ ते २०२४ पुर्यंत भारतीय जनता पार्टीचे सरकार केंद्रामध्ये आहे. पहिली ५ वर्षे राज्यात देखील सरकार होतं. ४०० पार झाल्यानंतर असं काय वेगळं होणार आहे ? आजही पार्लमेंटमध्ये ३०३ खासदार हे केवळ भाजपचे असल्याचं त्यांनी सांगितलं आहे.

# बीडमध्ये इनोव्हामध्ये तब्बल एक कोटी कॅश सापडल्याने एकच खळबळ

**गेवराई (जि. बीड) : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात पैशाचा पाऊस सुरुच असून आता बीडमधील गेवराई तालुक्यातील चेकपोस्टवर इनोव्हामध्ये तब्बल एक कोटी कॅश सापडल्याने एकच खळबळ उडाली आहे. बॉर्डर चेक पोस्टवर एक कोटी रुपये तपासणी दरम्यान आढळले आहेत. गेवराई तालुक्यातील खामगावमध्ये असलेल्या जिल्ह्याच्या बॉर्डरवर चेक पोस्टवर काल (४ मे) रात्री एका इनोव्हा कारमध्ये एक कोटी रुपये सापडले.**

रक्कम कोषागार कार्यालयाकडे सुपूर्त केली जाणार दरम्यान, यापैकी दहा लाख रुपयापेक्षा अधिकची रक्कम असल्याने ही रक्कम कोषागार कार्यालयाकडे सुपूर्त केली जाणार आहे. आयकर विभागाचे अधिकारी छत्रपती संभाजीनगर येथील बँकेच्या शाखेतून ही रक्कम काढली गेली होती की नाही याची माहिती घेणार आहेत. संभाजीनगरमधील द्वारकादास मंत्री बँकेच्या शाखेतून ही रक्कम बीड येथील बँकेच्या मुख्य शाखेत आणली जात असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. यावेळी या पैशासोबत संभाजीनगर येथून पैसे बाळगण्याचे परवानगी पत्र होते असे पोलिसांचे म्हणणे आहे.

दुसरीकडे, मुंबई पोलिसांनी शनिवारी रात्री

## राज्यात पैशाचा पाऊस सुरुच

बीकेसी परिसरात बनावट नोटा तयार करणाऱ्या कारखान्यावर धाड टाकत बनावट नोटा तयार केल्या जात होत्या. या कारखान्यात ५,१०,१००,५०० रुपयांच्या बनावट नोटा तयार केल्या जात होत्या. पोलिसांनी याठिकाणी धाड टाकून बनावट नोटा आणि त्यासाठी लागणाऱ्या कागदाचा साठा जप्त केला. याप्रकरणी पोलिसांनी नौशाद शाह आणि अली सय्यद या दोघांना अटक केली आहे. न्यायालयाने आरोपींना पाच दिवसांची पोलीस




कोठडी सुनावली आहे. याप्रकरणी बीकेसी पोलीस अधिक तपास करत आहेत. काही दिवसांपूर्वीच मुंबई उपनगरमधील भांडूप परिसरात पोलिसांनी साडेतीन कोटींची रोकड असलेली एक गाडी पकडली होती. मात्र,निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी चौकशी केल्यानंतर ही एटीएम व्हॅन असल्याचे समोर आले होते. या गाडीच्या चालकाकडे पुरेशी कागदपत्रे नसल्यामुळे पोलिसांना संशय आला होता. त्यामुळे ही एटीएम व्हॅन पोलिसांनी ताब्यात घेतली होती. मात्र, चौकशीनंतर ही व्हॅन सोडून देण्यात आली होती.

# आंतरजातीय विवाहावर ठाम असलेल्या मुलीचा आई-वडिलांनीच केला खून

## परभणी जिल्ह्यातील घटना, हत्येनंतर भावकीच्या मदतीने मृतदेह जाळला

परभणी - आंतरजातीय प्रेमविवाह करण्यावर ठाम असलेल्या आपल्या १९ वर्षीय मुलीला आईवडिलांनीच गळा दाबून ठार मारले. त्यानंतर भावकीतील काही जणांच्या मदतीने तिचा मृतदेह गावातील स्मशानभूमीत जाळून पुरावा नष्ट केला. ही घटना २१ एप्रिल रात्री १०.३० ते दि.२२ एप्रिल पहाटेच्या दरम्यान घडली आहे. याप्रकरणी शुक्रवार, ३ मे रोजी आईवडिलांसह भावकीतील इतर सहा जणांविरुद्ध पालम पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून मुलीच्या वडिलांना पोलिसांनी अटक केली आहे.

पालम तालुक्यातील नाव्हा येथील एका १९ वर्षांच्या तरुणीचे गावातीलच इतर जातीमधील तरुणाशी प्रेमसंबंध होते. ते दोघे प्रेमविवाहदेखील करणार होते. परंतु मुलीच्या आईवडिलांचा तिच्या प्रेमविवाहास विरोध होता. त्यामुळे त्यांनी मुलीला अनेक वेळा समजावून सांगण्याचा प्रयत्न केला पण मुलगी प्रेमविवाहावर ठाम होती. मुलीने आंतरजातीय प्रेमविवाह करू नये यासाठी आईवडिलांनी तिला २१ एप्रिल २०२४ रोजी रात्री १० ते २२ एप्रिलच्या पहाटे दरम्यान नाव्हा येथे तिचा गळा




दाबून ठार केले. त्याच रात्री कोणालाही थांगपत्ता लागू न देता भावकीतील निवडक व्यक्तींना सोबत घेऊन संगनमत करत मुलीचा मृतदेह नाव्हा येथील स्मशानभूमीत जाळून पुरावा नष्ट केला. परंतु गुप्त बातमीदाराडून मिळालेल्या माहिती वरून पोलिसांनी तपास करून ऑनर किलिंगचा हा गुन्हा उघडकीस आणला आहे.

पोलिस निरीक्षक रावसाहेब गाडेवाड यांच्या फिर्यादीवरून आरोपी वडील बालासाहेब भीमराव बाबर, आई रुक्मिणीबाई बालासाहेब बाबर, अच्युत दत्तराव बाबर, राजेभाऊ रखमाजी बाबर, अशोक रुस्तुमराव बाबर, आबासाहेब रुस्तुमराव बाबर, गंगाधर योगाजी बाबर, गोपाळ अशोक बाबर याच्याविरुद्ध शुक्रवारी (दि.३) पालम पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. तपासासाठी फॉरेन्सिक, एलसीबीसह पालम पोलिसांची पथके घटनास्थळी दाखल झाली असल्याची माहिती सपोनि मारुती कारवार व फौजदार डी. एस. जाधव यांनी दिली. या प्रकरणाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. समाधान पाटील करत आहेत.

खुनाच्या घटनेत आणखी आरोपी वाढण्याची शक्यता

गुप्त बातमीदाराने दिलेल्या माहितीवरून गुन्हा उघडकीस आला आहे. मुलीच्या वडिलास अटक करण्यात आली असून उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे. यात आणखीही आरोपी वाढण्याची शक्यता आहे. - डॉ. समाधान पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी

# एटीएम मशीनच नेले चोरून

## अंबाजोगाई शहरातील मध्यरात्रीची घटना



बीड : बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई शहरात चोरट्यांनी एटीएम मशीनच पळवून नेल्याचा धक्कादायक प्रकार आज सकाळी समोर आला आहे. शहरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा होणार असून या सभेच्या अर्ध्या किलोमीटरपेक्षा कमी अंतरावर ही घटना घडली आहे.

अंबाजोगाई आहे. ४ एप्रिलला मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी या एटीएमवर दरोडा घालत चक्क एटीएम मशीनचं लंपास केले आहे. दरम्यान, या 'एटीएम' मध्ये संबंधित बँकेची किती कॅश होती? ते अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनेची माहिती मिळताच अंबाजोगाई शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून घटनेचा अधिक तपास करीत आहेत.

पोलीस बंदोबस्त असताना चोरट्यांचे धाडस

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेच्या निमित्ताने परिसरात कालपासून मोठा पोलीस बंदोबस्त आहे. येणाऱ्या जाणाऱ्यांवर लक्ष ठेवलं जात आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात बंदोबस्त असताना चोरट्यानी एटीएम मशीन लांबवल्यामुळे आश्चर्य व्यक्त होत आहे. दरम्यान, अंबाजोगाई शहरात अज्ञात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी कठोर पावले उचलावीत, अशी मागणी सामान्य जनतेतून करण्यात येत आहे

# आष्टी येथे होणाऱ्या शरदचंद्रजी पवार यांच्या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे - अमोल सरोदे

आष्टी ।प्रतिनिधी

महाविकास आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार बजरंग (बप्पा) सोनवणे यांच्या प्रचारार्थ सोमवार दिनांक ६ मे रोजी सकाळी ११ वाजता आष्टी येथील ईदगाह मैदान येथे मा शरदचंद्रजी पवार साहेब यांची जाहीर सभा होणार असून सर्वांनी या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे (शरदचंद्रजी पवार गट) कडा गटांचे गटप्रमुख अमोल दादा सरोदे यांनी केले आहे. बीड लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग (बप्पा) सोनवणे यांनी संपूर्ण जिल्हा पिंजून काढला असून सर्व सामान्य नागरिकांचा त्यांना मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. सदरील निवडणूक ही जनतेने हातात घेतली असल्याने बजरंग सोनवणे यांचा विजय निश्चित झाला आहे. खासदार प्रीतम मुंडे यांच्या दहा वर्षाच्या काळात आष्टी मतदार संघात ग्रामीण भागात जनसंपर्क नसल्यामुळे जनतेत तीव्र नाराजी आहे. अहमदनगर बीड परळी रेल्वेचे स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांचे रेल्वेचे स्वप्न आज ही अधुरेच राहिले असून सदरील रेल्वे ही अहमदनगर ते अंमळनेर पर्यंत कधी येते तर कधी येत नाही. सदरील रेल्वे बीड व परळी पर्यंत कधी धावणार? का निवडणूक आली की रेल्वेचे गाजर दाखविले जाते. केंद्र सरकारच्या आरोग्यासाठी असलेल्या अनेक योजनांची




अंमलबजावणी होत नसल्यामुळे रुग्णांची हॉस्पिटलमध्ये होणारे लूट होत आहे. यामुळे सर्वसामान्य जनतेत तीव्र नाराजी आहे. केंद्र व राज्य सरकारमध्ये समन्वय नसल्यामुळे सर्वसामान्य जनतेला कोणताही लाभ मिळत नाही. सध्या आष्टीचे तिन्ही आजी माजी आमदार विकासासाठी एकाच बाजूने असले तरी विकासाची गंगा कागदावरच असल्याचे दिसून येते. त्यामुळे आष्टी मतदार संघाचा विकास करण्यासाठी बजरंग (बप्पा) सोनवणे यांच्या प्रचारार्थ माजी केंद्रीय कृषिमंत्री शरदचंद्रजी पवार साहेब ,भूषणसिंह राजे होळकर यांची आष्टी येथे सोमवारी सकाळी ११ वाजता जाहीर सभा होणार आहे. या सभेस उपस्थित. महेबूब शेख आ.संदीप क्षीरसागर. जीवनराव गोरे. मा.आ सय्यद सलीम. मा आ साहेबराव दरेकर,,मा आ उषा दराडे, मा आ पुथ्वीराज साठे,मा आ बदामराव पंडित, मा आ राजेंद्र जगताप, सुशीला मोराळे,बबन गिते, शिवसेना जिल्हाप्रमुख (उबाठा), परमेश्वर सातपुते, आष्टी विधानसभा राम खाडे, अण्णासाहेब चौधरी, काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, कॉग्रेस तालकाध्यक्ष रवि ढोबळे, मिलींद आव्हाड मानव हक्क अभियान चे राष्ट्रीय अध्यक्ष , ाल इंडीया पँथर दिपक भाई केदार ,डेमोक्ट्रीक पार्टी चे प्रदेश अध्यक्ष अजिंक्य चांगणे,अहमद पठाण ड.किशोर मुळे, सुनील नाथ, अमोल तरटे, आप चे अशोक येडे, ऑल इंडिया पँथर जिल्हा अध्यक्ष उपस्थित राहणार आहे. तसेच आष्टी विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी, सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कष्टकरी तसेच कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन कडाचे गटप्रमुख अमोल दादा सरोदे यांनी केले आहे.

# माजी मंत्री गंगाधर गाडे यांचे दु:खद निधन

अनंतोजी कालिदास

आंबेडकर चळवळीतील ढाण्या वाघ, नामांतर प्रणेता, संघर्ष नायक, धगधगता ज्वालामुखी, भीम योद्धा,.... गंगाधर गाडे काळाच्या पडद्याआड आपणास कळविताना अत्यंत दुःख होत आहे की पँथर्स रिपब्लिकन पार्टीचे संस्थापक अध्यक्ष, नामांतर प्रणेते, आंबेडकर चळवळीतील आग्रगण्य नाव, चळवळीचे पितामह, माजी परिवहन मंत्री मा. गंगाधरजी गाडे साहेब यांचे दिनांक ०४/०५/२०२४ रोजी पहाटे ४.०० वाजता दुःखद निधन झाले आहे. त्यांच्यावर छत्रपती संभाजी नगर येथील एशियन हॉस्पिटल या ठिकाणी शर्यतीचे उपचार चालू होते परंतु उपचारास प्रतिसाद न देता त्यांची प्राणज्योत दिनांक ०४/०५/२०२४ रोज शनिवार या दिवशी मावळली.



त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हीच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या चरणी प्रार्थना माझ्याकडून व माझ्या परिवाराकडून साश्रू नयनांनी भावपूर्ण श्रद्धांजली. असा नेता पुन्हा होणे नाही. अशा या दृढ नेत्यास माझा अखेरचा निळा सलाम... त्यांचा मृत्यदेह दर्शनासाठी पक्ष कार्यालय उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर औरंगाबाद या ठिकाणी दिनांक ०५/०५/२०२४ रोज रविवार या दिवशी दुपारी ठीक १२.०० ते ५.०० वाजता ठेवण्यात येणार आहे. त्यांचा अंत्यविधी सायंकाळी ठीक ५.०० वाजता नागसेन विद्यालय पीर बाजार उस्मानपुरा छत्रपती संभाजी नगर औरंगाबाद या ठिकाणी करण्यात येणार आहे. याची नोंद घ्यावी

# माजलगावात बजरंगबप्पा यांच्या विजयासाठी शेख मंजुर'डोअर टु डोअर

## बजरंगबप्पा सोनवणे यांना मतदान करण्याचे केले आवाहन

माजलगाव ।प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार बजरंगबप्पा सोनवणे मैदानात उतरले आहेत.त्यांच्या विजयासाठी माजी नगराध्यक्ष शेख मंजूर यांनी माजलगाव शहरातील चौकाचौकात,डोअर टु डोअर प्रचार करून बजरंगबप्पा सोनवणे यांना प्रचंड मताधिक्यानी विजयी करा असे आवाहन त्यांनी केले आहे.

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. माजलगाव शहरात ही माजी नगराध्यक्ष शेख मंजुर यांनी बजरंगबप्पा सोनवणे यांच्यासाठी प्रचारात आघाडी उघडली आहे. शहरात चांदणी ग्राउंड,बरकत नगर फुलेनगर गोडाऊन,आयशा नगर, कुरेशी मोहल्ला,फुले नगर,दावल मलिक,अरफान मोहल्ला,इंदिरा नगर,अशोक नगर,यासह रस्त्यावर शहरातील चौका चौकात, वेगवेगळ्या भागात डोअर टु डोअर प्रचार फेरी काढून मतदारांच्या भेटी घेत आहेत.यावेळी मतदारांना ते तुतारी फुंकणारा माणूस या



चिन्हा समोरील बटन दाबून बजरंगबप्पा ना विक्रमी मतांनी मतदान करण्याचे आवाहन करत आहेत. यावेळी मतदारांमधून त्यांच्या आव्हानाला चांगला प्रतिसाद मिळत होता.बजरंगबप्पा सोनवणे यांचे पारडे जड होत असल्याचे दिसत आहे.दरम्यान त्यांच्यासोबत शहराध्यक्ष शकील भाई कुरेशी, मौलाना इद्रिस,हाफेज मोहसीन, नुमान चाऊस,इमरान खान,शाकेर कुरेशी,निसार मामु,फेरोज कुरेशी, मजहर शेख,रईस शेख,मुज्जुभाई, अब्दुल समद,अमजद पठाण यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# खरिप हंगामासाठी शेतक-यां बरोबर कृषी कार्यालयाचे नियोजन !

## बियाण उगवण क्षमता प्रात्यक्षीक मोहिम सुरु ! अनाठाई खर्च टाळण्यासाठी सोयाबिन बियान घरचे वापरा !

शिरूर कासार(प्रशांत बाफना)

तालुक्यातील उसतोड मजूर परतला असुन तो खरिप हंगामाच्या पुर्वतयारीला लागला आहे ,शेतक-याबरोबर तालुका कृषी कार्यालय देखील खरिपपाच्या नियोजनात व्यस्त असुन खरीप हंगामात सोयाबिन उगवण क्षमता प्रात्यक्षीक मोहिम सुरू असुन अनाठाई खर्च टाळण्यासाठी घरचे बियाने प्रक्रिया करून वापरण्याचे आवाहन तालुका कृषी कार्यायाकडून करण्यात येत आहे .

अगामी खरिप हंगाम पुर्व तयारी म्हणून शेत नांगरणी ,खत ,बांधावरील जाळ्या तोडुन टाकणे तसेच उपलब्ध शेणखत शेतात नेणे आदि कामाची शेतक-याची लगबग सुरू आहे ,पाऊस कधीही येऊ शकतो आपली तयारी असली पाहिजे यासाठी उष्णतेची पर्वा न करता शेतकरी राबत आहे .

खरिप हंगामासाठी शेतक-यांना योग्य मार्गदर्शन करण्यासाठी कृषी कर्मचारी आता व्यस्त दिसून येत आहे , बियाणे उगवण प्रात्यक्षीक मोहिम सुरू केली असुन कमी खर्चात अधिक उत्पादनाचा कानमंत्र या मोहिमेतून दिला जात आहे .बियाण वापरण्याची शास्त्रिय पध्दती अवगत व्हावी यासाठी भानकवाडी ,रायमोह ,तागडगांव ,आनंदगांव आदी गावांप्रात्यक्षीक करून दाखवण्यात आले आहे .रूंद वरंबा सरी पध्दतीने पेरणी ,मृद आरोग्य पत्रिका अभियान ,बिज प्रक्रिया ,पिकावरील किड व रोग नियंत्रण ,शुन्य मशागत तंत्रज्ञान ,नविन पिक पध्दती या विषयावर मंडळ कृषी अधिकारी संतोष घसिंग यांनी मार्गदर्शन केले .ही मोहिम यशस्वी करण्यासाठी तालुका कृषी अधिकारी राजेंद्र नेटके ,उपविभागिय कृषी अधिकारी बाबासाहेब जेजूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील सर्व क्षेत्रिय कर्मचारी परिश्रम घेत आहेत .

खरिप हंगामात लागणारे सर्व प्रकारचे मार्गदर्शन तालुका कृषी कार्यालयाकडून दिले जाईल ,शंकानिरसन करण्यासाठी शेतक-यांनी संपर्कात राहवे ,व कमी खर्चात अदिक उत्पादन कसे घेता येईल याचा विचार करावा असे आवाहन ता.कृ.अ. राजेंद्र नेटके यांनी केले आहे .

# निवडणुकीआधी गेवराई तालुक्यातील खामगाव येथील चेक पोस्टवर सापडलं पैशाचं घबाड

## गेवराई पोलिसांनी कारमधून तब्बल १ कोटी रुपये पकडले; या घटनेनं मोठी खळबळ

गेवराई । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोठी कारवाई करण्यात आली आहे. निवडणूक काळात कोणतेही गैरप्रकार होऊ नयेत यासाठी बीड जिल्ह्यात विविध ठिकाणी चेकपोस्ट कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. गेवराई तालुक्यातील खामगाव चेकपोस्टवर एका कारमधून नेण्यात येत असलेली कोट्यवधी रुपयांची रक्कम पोलिसांनी जप्त केली आहे. या घटनेनं मोठी खळबळ उडाली आहे.गेवराई तालुक्यातील खामगाव येथील निगरानी पथकास तपासणी करताना एका कारमध्ये तब्बल एक कोटी रुपये आढळून आले. हा प्रकार ७.३० च्या सुमारास उघडकीस आला. सदरील रोकड जप्त करुन कोषागार विभागाकडे देण्याची प्रक्रिया रात्री उशीरापर्यंत सुरु असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. छत्रपती संभाजी नगरवरुन येणारी कार क्रमांक



एमएच-२३ एडी-०३६६ ची तपासणी खामगाव येथील एसएसटी पथकाने केली असता त्यामध्ये एक लोखंडी पेटी आढळून आली. सदरील पेटी उघडली असता त्यामध्ये एक कोटी रुपये आढळून आले. याबाबतची माहिती अतिरिक्त सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार संदिप खोमणे व पोलिस निरिक्षक प्रविणकुमार बांगर यांना देण्यात आली. त्यांनी तत्काळ घटनास्थळास भेट दिली. वाहन चालकास सदरील रकमेबाबत माहिती विचारली असता ही एक कोटी रुपये बीड येथील द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेची आहे.

छत्रपती संभाजी नगर मंत्री बँकच्या शाखेतून ही रक्कम बीड येथील बँकेच्या मुख्य शाखेत आणली जात असल्याचे सांगण्यात आले. कारमध्ये तीनजण होते असे सूत्रांनी सांगितले. सदरील रकमेच्या वाहतुकीबाबत निवडणूक आयोगाच्या इएमएमएसएद्वारे जनरेट झालेला बारकोड नव्हता. परंतु त्यांच्याकडे संभाजी नगर येथून परवानगी पत्र होत असे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे सदरील रक्कम जप्त करण्याची प्रक्रिया रात्री उशीरापर्यंत सुरु होती. सदरील घटनेचा पंचनामा पथक प्रमुख महेश मेटे यांनी करुन पुढील कारवाईसाठी अतिरिक्त सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे देण्यात आला आहे. या कारवाईत अधिकाऱ्यांसोबतच काशिनाथ माने, शरद मिसाळ, धीजर खांडेकर यांचाही सहभाग होता.



# बजरंग सोनवणे यांना केज तालुक्यातून आणखी एक धक्का

## सोनवणेंच्या ताब्यातील मुलेगाव ग्रामपंचायतच्या सरपंच, सदस्य व कार्यकर्त्यांचा धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

परळी - महाविकास आघाडीचे लोकसभा उमेदवार बजरंग सोनवणे यांना ऐन निवडणुकीत आणखी एक धक्का बसला असून, त्यांच्या ताब्यातील मुलेगाव ग्रामपंचायतचे सरपंच, अन्य सदस्य व अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. लोकसभा निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आला असताना बजरंग सोनवणे यांच्या ताब्यातील महत्त्वाचे गाव असलेल्या मुलेगाव ग्रामपंचायत धनंजय मुंडे यांच्या ताब्यात आल्याने बजरंग सोनवणे यांना निश्चितच याचा फटका बसणार आहे. मुलेगावचे सरपंच बाळासाहेब लाड, सदस्य सुंदर लाड, बालासाहेब हारगावकर, अश्रुबाई जनार्दन लाड, मेघराज लाड, तुकाराम लाड, शरद हारगावकर, कळमअंबा ग्रामपंचायत सदस्य राजू हिरवे, अक्षय लाड, विनायक लाड, दशरथ लाड यांसह अनेकांनी धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत व राष्ट्रवादी काँग्रेसचे केज तालुकाध्यक्ष विष्णू चाटे यांच्या पुढाकारातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.

# बँकेत पैसे भरण्यासाठी गेलेल्या ग्राहकाला कॅशिअरची अरेरावीची भाषा

## कॅशिअरने दिले ग्राहकाच्या अंगावर पैसे फेकून; गेवराईच्या एसबीआय शाखेतील प्रकार




गेवराई । प्रतिनिधी

बँकेत पैसे भरण्यासाठी गेलेल्या एका ज्येष्ठ नागरिकाला कॅशिअरने अरेरावी केल्याचा प्रकार गुरुवारी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखेत घडला आहे. ग्राहकाचे पैसे फेकून दिल्याने बँकेच्या कारभाराविरोधात संताप व्यक्त केला जात आहे. ग्राहकाने त्याची ची तक्रार मुख्यमंत्री व वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली आहे.

गेवराई शहरातील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेत कैलास मोरे यांचे खाते आहे. गुरुवारी सकाळी ११ वाजता ते एक लाख रुपये नगदी भरणा करण्यासाठी गेले होते. कॅशिअर शुभम गायकवाड यांच्याकडे पैसे दिल्यानंतर त्यांने पैसे मोरे यांच्या अंगावर फेकले. येथून बाहेर जा, चलन दुसऱ्या काउंटरवर भरावे लागते. माहिती नाही का, असे अरेरावीची भाषा करून अपमान केला.

दरम्यान एकेकाळी मोरे यांचा उत्तम व्यवहार असल्याबद्दल बँकेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला होता. असे असतानाही बँकेच्या अधिकाऱ्यांकडून त्यांना सापत्न वागणूक मिळाल्याने संताप व्यक्त केला जात आहे. कॅशिअरची तक्रार मुख्यमंत्री व वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे ऑनलाइन करण्यात आली आहे.

# आण्णासाहेब राठोड यांचा मताची मागणीसाठी परिचय कमी पडत आहे का?

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्या मध्ये शरदचंद्रजी पवार साहेब यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्रजी पवार) या पार्टीचे आण्णासाहेब राठोड यांची तालुका अध्यक्ष म्हणून निवड केली, पण ही निवड योग्य आहे का? आशी चर्चा गेवराई तालुक्या मध्ये संध्या सुरू आहे, आण्णा साहेब राठोड यांची ओळख फक्त काही तंडे मोजकेच लोक व गावा मध्ये आहे का?, गेवराई शहरात यांच्या परिचय नाही आसे संध्या प्रचारा दरम्यान दिसून येत आहे, मागील काही दिवसांपासून माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाच्या किसान सेलच्या प्रदेश अध्यक्ष पुजा ताई मोरे डोर टु डोर प्रचार करून मतदाराचे भेटी गाटी घेत आहेत हे गेवराई तालुक्यातील प्रत्येक घरा मध्ये



प्रचार करत आहेत, त्यामुळे बजरंग बप्पा सोनवणे यांचे पारडे जड आहे, आण्णासाहेब राठोड तालुका अध्यक्ष झाले खरे पण याचा गेवराई तालुक्या मध्ये किती परिचय आहे हे पाहणे गरजेचे होते , शरदचंद्रजी पवार हे तालुकाध्यक्ष निवड करण्यात चुकले का? गेवराई तालुक्या मध्ये आण्णा साहेब राठोड यांनी बजरंग बप्पा सोनवणे यांच्या साठी किती परिश्रम घेतले, हे बजरंग बाप्पा यांना ही लक्षात येत असेल, तालुकाध्यक्ष यांच्या कडून जे काम होणे गरजेचे आहेते संध्या होताना दिसत नाही, बाप्पा वेळ गेली नाही आजून आपण स्वतः गेवराई तालुक्या मध्ये काय चालु आहे लक्ष दया काही लोका मुळे आपल्या मताची घट होत आहे, या कडे लक्ष दया. तालुकाध्यक्ष याचा परिचय कमी पडत आहे, गेवराई शहरात मतदान जास्त आहे, गेवराई शहरा मध्ये तालुका अध्यक्ष फिरले का? माजी राज्यमंत्री बदामराव पंडित म्हणजे लोक नेते माझी पंचायत समिती सदस्य पुजा ताई मोरे यांच्या मुळे आपले पारडे जड आहे यात मात्र तिळभर शंका नाही, बाप्पा आपल्या पक्षात जे नवीन आले आहेत यांच्या कडे लक्ष दया.

# घरातून बाद झालेल्या चुलीनेकालिका देवी मंदिरात बस्तान कायम राखले !

**दोन क्विंटलच्या बाजरीच्या भाकरी त्या देखील चुलीवरच्या ,दोन कढया ढक्कू सोबत एक क्विंटल कांदा आणि कैरी !**



शिरूर कासार (प्रशांत बाफना)

धूरमुक्त घर या अभिनव संकल्पनेतून गॅसमुळे घरातून चुलीचे अस्तित्व संपुष्टात आले मात्र घरातून परागंदा झालेल्या या चुलीने कालिका देवी मंदिरात आपले बस्तान कायम राखले असल्याचे आजही स्पष्टपणे दिसून येते ,चैत्र महिण्यात देवीच्या आराधना ही परंपरा असुन वेगवेगळे पदार्थाच्या प्रसादाची मेजवानी सर्वासाठी विना निमंत्रणाची चालू असते यात चुलीवरच्या बाजरीच्या भाकरी आणि खमंग ढक्कू ही प्रसिद्ध व आवडीची मेजवानी मानली जाते या निमित्ताने घरातून बाध झालेल्या चुलीचे अस्तित्व कायम असल्याचे स्पष्ट चित्र मंदिरात दिसून येते .

शुक्रवारी कधीकाळी शिक्षक म्हणून सेवेतून निवृत्त झालेले व सध्या संभाजीनगर येथे वास्तव्यास असलेले व्यवहारे कुटूंबाने देवीच्या आराधना घातल्या आणि आपल्या जून्या आठवणींना उजाळा देत चुलीवरच्या बाजरीच्या भाकरी आणि ढक्कुचाच प्रसाद देण्याची संकल्पनाची पुर्ती केली .विस चुलीवर दोन क्विंटलच्या भाकरी ,दोन मोठ्या कढया खमंग ढक्कू ,त्यात गोड प्रसाद म्हणून काजु मणुके मिश्रित लापशी आणि चवीला पुष्टी देण्यासाठी एक क्विंटल कांदा कैरी असा खमंग बेत ठेवला होता .

कालिकामातेचा महाभिषेक ,महावस्त्राने पुजा आरती करून नैवेद्य समर्पित केल्यानंतर घंटा वाजला आणि सर्व महिला पुरूष ते देखील बगर निमंत्रणा शिवाय मंदिरात येऊन पोटभर प्रसाद घेतला जवळपास दोन हजार भाविकांनी लाभ घेतला .

### तवाभर फुगलेली भली मोठी भाकरी !

सध्या सर्वच कसा हलका फुलका जमाना मानला जातो ,घरी गॅसवर भाकरी करायला नको वाटते ,चुलीवरची भाकरी ती देखील कागदासारखी पातळ हॉटेलमधे दहा पंधरा वीस रूपये मोजून घ्यावी लागते मात्र देवीच्या मंदिरात तवाभरून आणि फुगलेली खमंग भाकरी आकर्षीत केल्याशिवाय राहत नाही .

# नारळाच्या रूपाने राक्षसभुवनमधे अवतरले नगदनारायण ,भव्य स्वागत मिरवणूक !

**श्रीक्षेत्र नारायण गडाचा ७३ वा नारळी सप्ताह !**



शिरूर कासार ।प्रतिनिधी

धाकटी पंढरी असलेल्या श्रीक्षेत्र नारायण गडाच्या फिरत्या ७३ व्या नारळी सप्ताहाचे पुढच्या वर्षीचे यजमानपद राक्षसभुवन ग्रामस्थांनी शिरसमार्गच्या सप्ताहात नारळ घेऊन स्विकारले आहे ,त्या नारळाची नगदनारायणाच्या रूपात ग्रामस्थांनी मोठ्या जल्लोषात स्वागत भव्य मिरवणूकीने केले .

श्रीक्षेत्र नारायण गडाला धाकटी पंढरी असे नामाभिधान असुन लाखावर भक्त जोडलेले आहेत ,गडावरील प्रतेक एकादशीला वारी निमित्ताने हजारावर भाविक दर्शनासाठी रांगा लावत असतात त्याशिवाय वर्षभरात वेगवेगळे नित्य नैमित्तीक धार्मिक कार्यक्रम सुरूच असतात ,वार्षीक नारळी सप्ताह ही मोठी पर्वणी असते लाखावर भाविक उपस्थित राहून अध्यात्मिक आनंद घेत असतात ,नारळ देऊन सप्ताहाचे यजमान पद देण्याची परंपरा असुन यावर्षी २१ ते २८ दरम्यान शिरसमार्ग येथे हा सप्ताह संपन्न झाला ,काल्याच्या किर्तनादिवशी राक्षसभुवन ग्रामस्थानी तिथे जाऊन नारळ स्विकारले यावेळी दोनशे मोटार सायकल व शंभराव चारचाकी वाहनांची भव्य रॅली काढण्यात आली होती . महंत शिवाजी महाराज यांनी राक्षसभुवन ग्रामस्थांना पुढील सप्ताहाचे यजमानपदाचे नारळ दिले . शिरूर ते राक्षसभुवन भव्य मिरवणूक तोफांची सलामी ! नारळाच्या रूपाने आपल्या गावात नगदनारायण महाराजच अवतरले हा भाव ठेऊन महिला पुरूष भाविक मोठ्या संखेने सहभागी झाले होते .

# विद्यार्थ्यांच्या निट परीक्षेसोबत पालकांची अग्निपरीक्षा:– डॉ.गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

आज दि.५ रविवार रोजी निटपरीक्षा असल्याने परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना विविध ठिकाणी जावे लागते.काही विद्यार्थ्यांना अगदी जिल्ह्याच्या शेवटचे टोक असणा-या तालुक्यातील ठिकाणी दोन अडिच तासांचा प्रवास करून जावे लागते. आर्थिक सक्षमता असलेले पालक स्वतःच्या अथवा खाजगी वाहनांद्वारे परीक्षेच्या ठिकाणी पोहचतात.आर्थिक स्थिती मजबूत नसलेल्या पालकांनी विद्यार्थ्यांना एसटीने प्रवास करत परीक्षाकेंद्राच्या ठिकाणी अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.त्यातही असणारी परीक्षा केंद्रे शहरापासून ६-७ किलोमीटर शहराच्या बाहेर आहेत.त्याठिकाणी साधे पिण्याच्या पाण्याची सुद्धा सोय नाही.सकाळी ११ वाजता गेटच्या आतमध्ये सोडणा-या विद्यार्थ्यांचा पेपर दुपारी २ ते सायं ५ वाजुन २० मिनिटापर्यंत आहे.सकाळी ७-८ वाजता घरून थोडं फार खाऊन निघालेल्या विद्यार्थ्यांनी सकाळी ११ ते सायं साडे ५ तास



उपाशीपोटी परीक्षा द्यायची. बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना नाहकत्रास सहन करावा लागत असुन तालुक्यातील विद्यार्थ्यांना तालुक्याच्या ठिकाणी परीक्षा केंद्राची व्यवस्था केली तर निदान त्यांचे हाल होणार नाहीत. यावर्षी तिव्र उन्हाळा असल्याने उष्माघाताचा त्रास परीक्षार्थींना होऊ शकतो याची काळजी शिक्षण विभागाने घेणे गरजेचे आहे अशी प्रतिक्रिया पालकवर्गामधुन व्यक्त होत आहे.

# महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांचा आष्टीत तालुक्यात झंझावाती दौरा

आज आष्टी तालुक्यातील मराठवाडी,हारेवाडी,वाघळूज,लमानतांडा, धानोरा,अंभोरा गावात महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी गाठीभेटी दौरा केला असता यावेळी जनतेच्या मनात शेतकरी पुत्र बजरंग बप्पाच आहेत हे दिसून आले व नंतर

शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या प्रमुख उपस्थितीत आष्टी तालुक्यातील पदाधिकाऱ्यांची व कार्यकर्त्यांची बैठक मोठ्या उत्साहात संपन्न झाली.यावेळी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर म्हणाले सर्वसामान्यांची घर फोडण्याचे काम देशोधडीला लावण्याचे काम हे सरकार करतय ह्यांना जर आपल्याला गाडायचे असेल तर बजरंग बप्पा च्या रूपाने



तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हावरती मतदान करून १३ तारखेला आपला खासदार दिल्ली ला पाठवायचा आणि दिल्लीची हुकूमशाही राजवट पालती पाडायची आपली सत्ता या राज्यांमध्ये आणायची हे सर्व सामान्य माणसाच स्वप्न आहे म्हणून सर्व सामान्य माणूस आज पेटून उठला आहे.म्हणून या निवडणुकीत उद्धव साहेबांना व पवार साहेबांना कोण हारवू शकत नाही आणि तोच निश्चय करून तुम्ही आम्ही कार्यकत्यांनी तळागाळाशी जाऊन रात्रंदिवस मेहनत घेऊन महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांना दिल्लीत पाठवायचे..!! याप्रसंगी लोणी व दौलावडगाव गटातील असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून शिवसेनेत प्रवेश केला असता त्यांचे अभिनंदन करून शिवसेनेच्या परीवारात त्यांचे हार्दिक स्वागत केले.नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडी केल्या व पक्ष संघटन वाढीसाठी जोमाने कामाला सुरुवात करावी असे सांगितले.याप्रसंगी राष्ट्रवादी चे तालुका अध्यक्ष परमेश्वर काका शेळके,जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, आष्टी तालुक्याचे तालुका प्रमुख सुभाष राऊत, विधानसभा प्रमुख नवनाथ अटूळे,शहर प्रमुख महेश एकशिंगे, तालुका संघटक ज्ञानदेव मुटकुळे, शेतकरी सेनेचे तालुकाप्रमुख देविसिंग बिसेन,उपतालुकाप्रमुख अक्षय साप्ते, उपतालुकाप्रमुख दादा लगड, उपतालुकाप्रमुख संदीप हाडे, शिवाजी थोरवे, रामदास मोहिते, अजय गायकवाड,बापूराव काळे, शिवप्रसाद जाधव, अखिल पठाण,साईराम पाखरे सह सर्व पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते..!!



माजी मंत्री गेवराईचे भावी आमदार बदामराव पंडित यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना काशिनाथ आढागळे सह सर्व मित्र परिवार

# शिष्यवृत्ती परिक्षेत मानूरकर महाराज इंग्लिश स्कुलने मान उंचावली !

पंधरा परिक्षार्थी ठरले पात्र !

शिरूर कासार ।प्रतिनिधी

तालुक्यातील मानूरकर महाराज इंग्लिश स्कुलने शिष्यवृत्ती परिक्षेत यशाचा मोठा पल्ला गाठत तालुक्याची मान उंचावली असुन तब्बल पंधरा परिक्षार्थी शिष्यवृत्ती साठी पात्र झाले असल्याने त्यांचे सर्वत्र कौतूक केले जात आहे . स्पर्धेच्या युगात अभ्यास आणि मार्गदर्शनाच्या बळावर शिक्षण विभाग एकामागुन एक यशाचा पल्ला पार करत असुन १८ फेब्रुवारी ला घेण्यात आलेल्या पुर्व प्राथमीक शिष्यवृत्ती परिक्षेचा निकाल ३० एप्रील रोजी जाहिर झाला असुन यात श्री नागनाथ शिक्षण प्रसारक मंडळाच्या आय एस ओ मानांकन प्राप्त व स्वच्छ विद्यालय पुरस्कार प्राप्त मानूरकर महाराज इंग्लिश स्कुलचे पंधरा विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे त्यात दत्तात्रय तांबे ,संज्योत गाडेकर ,पायल घुले ,नम्रता नितळ ,कार्तिक पानखडे ,पवन गारूडकर ,शिवराज तांबे ,मयुरेश मानकर ,आर्यन मानकर ,सुरज नन्नवरे ,वैभव सानप ,अरमान शेख ,अनुष्का नेटके ,संग्राम जाधव ,ईश्वरी तांबे हे शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत .

संस्थेचे अध्यक्ष १०८ गुरू विरूपाक्ष शिवाचार्य महाराज ,उपाध्यक्ष ॲड विजयकुमार वेलदे , कार्याध्यक्ष विजयकुमार भांडकर ,,खजिनदार प्रभाकर इजारे ,प्रा बी सी मैंदर्गी ,मुख्याध्यापक प्रशांत घुले सह सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व पालक यांनी या परिक्षार्थिंचे स्वागत केले आहे .

# पंकजाताई मुंडेसाठी रमेश आडसकरांचा माजलगावात घरोघरी जाऊन प्रचार

**जिल्ह्याला विकसित करायचे असेल पंकजाताई मुंडे विक्रमी मताधिक्याने विजयी होणे आवश्यक – रमेश आडसकर**



माजलगाव ।प्रतिनिधी

जिल्हा सर्वांगीण विकास करून जिल्ह्याला सुजलाम सुफलाम करण्यासाठी भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन भाजपाचे ज्येष्ठ नेते रमेशराव आडसकर यांनी केले.. आज पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ महायुतीच्या नेत्यांनी माजलगाव मध्ये घरोघरी जाऊन मतदारांशी संवाद साधला. यावेळी मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

बीड लोकसभा मतदारसंघातील भाजपा शिवसेना राष्ट्रवादी कॉंग्रेस रिपाई रासप मनसे महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ आज माजलगाव शहरामध्ये महायुतीच्या नेत्यांनी भव्य पदयात्रा काढून मतदारांशी थेट घरोघरी जाऊन संवाद साधला. पंकजाताई मुंडे या विकासाची दृष्टी असलेल्या नेत्या असून राज्याच्या मंत्रिमंडळात त्यांनी केलेली काम आजही चर्चेला जात आहेत. पंकजाताई मुंडे यांनी जलजीवांच्या माध्यमातून मराठवाड्यात अनेक कामे करून पाणी पातळीमध्ये वाढ करण्यामध्ये त्यांचे मोलाचे योगदान आहे. ग्रामीण भागातही रस्त्याचे जाळे त्यांनी विणले असून विकासाची गती वाढवण्यासाठी पंकजाताई मुंडे यांना विजयी करणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन रमेशराव आडसकर यांनी केले. महायुतीच्या नेत्यांनी आज माजलगांव येथे गजानन नगर, शाहु नगर,सिद्धी विनायक मंदिर, बायपास रोड आदी भागात भव्य पदयात्रा काढून मतदारांशी घरोघरी जाऊन संवाद साधला. यावेळी जाहीरनामा व पत्रकांचे वाटपही करण्यात आले.

भाजपचे ज्येष्ठ नेते डॉ. प्रकाशराव आनंदगावकर, माजी नगराध्यक्ष डॉ. अशोकराव तिडके, अच्युतराव लाटे, अनंतराव शेंडगे, डॉ. प्रशांत पाटील, राहुल लंगडे, विनायक रत्नपारखी, सतिश जोशी, आनंद कुलकर्णी, बाबासाहेब आगे, दत्ता महाजन, वैभव मिटकरी, छबन घाडगे व भारतीय जनता पार्टी व महायुतीचे कार्यक्रते पदाधीकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT